Pimpri Chinchwad Education Trust's

# Pimpri Chinchwad College of Engineering (PCCoE)

(An Autonomous Institute)

Affiliated to Savitribai Phule Pune University(SPPU)

ISO 21001:2018 Certified by TUV SUD

## Examination Circular

Ref: PCCOE/Exam Circular/2025-26/781

दिनांकः-18/12/2025

**विषयः- राज्यातील 29 महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर दिनांक 14 ते 16 जानेवारी 2026 या कालावधीत** First Year Summative Assessment Jan. 2026 **च्या नियोजित अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या वेळापत्रकामधील बदलाबाबत.**

**संदर्भः**

1. मा.राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांचे संदर्भ पत्र कं रानिआ/मनपा-2025 प्र. कं.80का-5 दिनांक 15/12/2025 चे पत्र.

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते कि, मा राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे-1 यांच्या दिनांक 15/12/2025 रोजीच्या पत्रकास अनुसरून राज्यातील 29 महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर दिनांक 14 ते 16 जानेवारी 2026 या दरम्यान आयोजित केलेल्या First Year Summative Assessment Jan. 2026 या परीक्षांचे वेळापत्रक बदलण्यात आलेले आहे. बदललेले वेळापत्रक http://www.pccoepune.com/timetable-examinations.php या महाविद्यालयाच्या अधिकृत वेबसाईटला प्रसिध्द करण्यात आलेले आहे..

तरी सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी याची नोंद घ्यावी.

PCET's Pimpri Chinchwad College of Engineering, An Autonomous Institute, Nigdi, Pune-44

डॉ. गोविंद ना. कुलकर्णी

संचालक

Copy to –

1- Deputy Director, Registrar
2- Deans: Academic / Quality Assurance / R&D / I&R / III / SDW / COE / Dy.COE
3- Program Head: MECH / COMP / E&TC / IT / CIVIL / AS&H / MCA / B.Voc
4- Librarian / System & IT Support / Workshop / T&P / Physical Director / Campus In charge / Warden Girls Hostel / Rector Boys Hostel
5- All Department Exam Coordinator: for circulate among concern student.
6- Office Copy

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.८०/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
ई-मेल: sec.corp@mah.gov.in
दिनांक : १५ डिसेंबर, २०२५

<u>निवडणूक तात्काळ</u>
ई-मेलद्वारे

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,

विषय:- राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम-२०२५-२६.

संदर्भ:- मा.सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र.१९७५६/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०६/०५/२०२५ व दिनांक १६/०९/२०२५ रोजी दिलेले निर्देश.

महोदय/महोदया,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाअंतर्गत परिशिष्ट - १ मध्ये नमूद केलेल्या २८ महानगरपालिका तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका अशा सर्व २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका घेणे आवश्यक आहे.

सर्व २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना व आरक्षण अंतिम करण्यात आले आहे. तसेच मतदार यादीच्या कार्यक्रमानुसार प्रारुप मतदार याद्या प्रसिध्द करुन त्यावर हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत व त्यानुसार अंतिम प्रभाग निहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन दि.१५/१२/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या आहेत व येत आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ व संलग्न याचिकांमध्ये दि.०६ मे, २०२५ व दि.१६ सप्टेंबर, २०२५ रोजी दिलेल्या निर्देशानुसार व सदर याचिकेतील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची कार्यवाही दि.३१ जानेवारी, २०२६ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे.

त्यानुसार राज्यातील २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम याद्वारे खालीलप्रमाणे जाहीर करण्यात येत आहे. -

१. **निवडणूक कार्यक्रम** - २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राबविण्यात यावा.

| अ.क्र. | महानगरपालिका | प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम |
|---|---|---|
| १ | परिशिष्ट-१ मध्ये दर्शविलेल्या २८ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता | परिशिष्ट-२ मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार |
| २ | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरीता | परिशिष्ट-३ मध्ये दर्शविलेल्या वेळापत्रकानुसार |

२. **निवडणुका न्यायालय निर्णयाच्या अधीन** - उपरोक्त सर्व २९ महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका ह्या मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१९७५६/२०२१ व अन्य संलग्न याचिकांमध्ये दि.०६ मे, २०२५, दि.१६ सप्टेंबर, २०२५ व दि. २८ नोव्हेंबर, २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार या याचिकेमध्ये होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहतील.

३. **पारंपारिक पध्दतीने (offline) नामनिर्देशनपत्र** - या निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र स्विकारण्याची प्रक्रिया पारंपरिक पध्दतीने (offline) होणार असून छापील नामनिर्देशनपत्रामध्ये तसेच शपथपत्रामध्ये माहिती भरावी. दृढकथन करुन व स्वाक्षरी करुन आवश्यकतेनुसार सर्व आवश्यक कागदपत्रे जोडून ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने सादर करावे. अशा प्रकारे भरलेला व स्वाक्षरी केलेला नामनिर्देशन पत्राचा अर्ज नामनिर्देशनपत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. महानगरपालिकेने नामनिर्देशनपत्र व शपथपत्र इ. नमुने उमेदवारांकरीता उपलब्ध ठेवावेत.

४. जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुभा - राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रासोबत जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची पोचपावती नामनिर्देशन पत्रासोबत सादर करण्याची त्यांना मुभा देण्यात आली आहे. यासंदर्भात शासनाच्या दि.३ नोव्हेंबर, २०२५ च्या अध्यादेशाद्वारे अधिनियमात सुधारणा करण्यात आली असून जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता निवडून आल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत सादर करण्याबाबतची तरतूद केली आहे. या तरतुदीनुसार कार्यवाही करावी. उमेदवार निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून अधिनियमातील तरतुदीनुसार जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल असे विहित केलेले हमीपत्र उमेदवाराकडून घेण्यात यावे. त्याअनुषंगाने सुधारीत नामनिर्देशनपत्र व शपथपत्र यांचे नमुने दि.१२ डिसेंबर, २०२५ च्या आदेशान्वये पाठविण्यात आले आहेत.

५. आचारसंहिता - निवडणुकीची आचारसंहिता निवडणूक कार्यक्रम निर्गमित केलेल्या वेळेपासून व दिनांकापासून लागू झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. वरील आचारसंहिता सार्वत्रिक निवडणुकांकरिता महानगरपालिकांच्या संपूर्ण क्षेत्रात लागू राहील. उपरोक्त क्षेत्रातील मतदारांवर प्रलोभन देणारी कोणतीही कृती/ घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक, इतर पदाधिकाऱ्यांना किंवा शासनाच्या विभागाला इतरत्र सुध्दा करता येणार नाही. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४२/का-७, दि.०४ नोव्हेंबर, २०२५ चे आदेश विचारात घ्यावेत.

६. न्यायालयीन प्रकरण - सार्वत्रिक निवडणूक असलेल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसंदर्भात न्यायालयात याचिका दाखल झाल्या असल्यास याबाबतची खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त यांची राहील. तसेच कोणत्याही रिट याचिकेमध्ये मा. न्यायालयाचे

स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम तात्काळ रद्द/ स्थगित करुन तसे आयोगास अवगत करावे.

७. **पूर्वतयारीचे आदेश** - राज्य निवडणूक आयोगाने क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.७९/का.०५, दि. १४ डिसेंबर,२०२५ रोजीच्या आदेशान्वये सदर निवडणुकांच्या अनुषंगाने करावयाच पूर्वतयारीबाबत सविस्तर आदेश दिलेले आहेत. त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

८. सदरचा निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. राज्य निवडणूक आयोगाचे संकेतस्थळ व ई-मेल आयडी पुढील प्रमाणे:-

| | |
|---|---|
| संकेत स्थळ | : https://mahasec.maharashtra.gov.in |
| ई-मेल | : sec.corp@mah.gov.in |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(सुरेश काकाणी) १५.१२.२०२५

सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र- परिशिष्ट-१ व २

प्रत :- १) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

३) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग

४) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

५) अपर मुख्य सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

७) सर्व विभागीय आयुक्त,

८) सर्व जिल्हाधिकारी

९) सर्व पोलीस आयुक्त

१०) संबंधित जिल्हा पोलिस अधिक्षक

११) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई- ४०० ००४.

१२) राज्य निवडणूक आयोगाचे मा.सर्वोच्च न्यायालय व मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या चारही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील.

१३) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

१४) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने

## परिशिष्ट - १

### परिशिष्ट-२ मधील कार्यक्रमानुसार सार्वत्रिक निवडणुका होणाऱ्या २८ महानगरपालिकांची यादी

| अ.क्र. | विभाग | जिल्हा | महानगरपालिकेचे नाव | वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | कोकण विभाग | ठाणे | ठाणे | ब |
| २ | | | नवी मुंबई | क |
| ३ | | | उल्हासनगर | ड |
| ४ | | | कल्याण-डोंबिवली | क |
| ५ | | | भिवंडी-निजामपूर | ड |
| ६ | | | मिरा-भाईंदर | ड |
| ७ | | पालघर | वसई-विरार | क |
| ८ | | रायगड | पनवेल | ड |
| ९ | नाशिक विभाग | नाशिक | नाशिक | ब |
| १० | | | मालेगांव | ड |
| ११ | | अहिल्यानगर | अहिल्यानगर | ड |
| १२ | | जळगाव | जळगांव | ड |
| १३ | | धुळे | धुळे | ड |
| १४ | पुणे विभाग | पुणे | पुणे | अ |
| १५ | | | पिंपरी-चिंचवड | ब |
| १६ | | सोलापूर | सोलापूर | ड |
| १७ | | कोल्हापूर | कोल्हापूर | ड |
| १८ | | | इचलकरंजी | ड |
| १९ | | सांगली | सांगली-मिरज-कुपवाड | ड |
| २० | छत्रपती संभाजीनगर विभाग | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर | क |
| २१ | | नांदेड | नांदेड-वाघाळा | ड |
| २२ | | परभणी | परभणी | ड |
| २३ | | जालना | जालना | ड |
| २४ | | लातूर | लातूर | ड |
| २५ | अमरावती विभाग | अमरावती | अमरावती | ड |
| २६ | | अकोला | अकोला | ड |
| २७ | नागपूर विभाग | नागपूर | नागपूर | अ |
| २८ | | चंद्रपूर | चंद्रपूर | ड |

५/७

<u>परिशिष्ट - २</u>

<u>२८ महानगरपालिका (बृहन्मुंबई वगळून) सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम - २०२५-२६</u>

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र. ८०/का.५, दि. १५/१२/२०२५ सोबतचे सहपत्र)

| अ.क्र | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु अथवा पूर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|
| | मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | दि. ०१ जुलै, २०२५ (मंगळवार) |
| १ | आयुक्त, महानगरपालिका यांनी निवडणूक कार्यक्रमाची सूचना शासन राजपत्र व किमान दोन स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याची तारीख | दि. १८ डिसेंबर, २०२५ (गुरुवार) |
| २ | नामनिर्देशनपत्र देण्याचा कालावधी | दि. २३ डिसेंबर, २०२५ (मंगळवार) ते दि. २९ डिसेंबर, २०२५ (सोमवार) (सकाळी ११ ते दुपारी ३)<br>दि. ३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार) (सकाळी ११ ते दुपारी २)<br>(गुरुवार दि.२५ डिसेंबर, २०२५ व रविवार दि.२८ डिसेंबर, २०२५ रोजी नामनिर्देशनपत्रे देण्यात येणार नाहीत) |
| ३ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | दि. २३ डिसेंबर, २०२५ (मंगळवार) ते दि. ३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार) (सकाळी ११ ते दुपारी ३)<br>(गुरुवार दि.२५ डिसेंबर, २०२५ व रविवार दि.२८ डिसेंबर, २०२५ रोजी नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत) |
| ४ | नामनिर्देशनपत्रांची छाननी | दि. ३१ डिसेंबर, २०२५ (बुधवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ५ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |
| ६ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | दि. ०२ जानेवारी, २०२६ (शुक्रवार) पर्यंत (सकाळी ११ ते दुपारी ३) |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | दि. ०३ जानेवारी, २०२६ (शनिवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ८ | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दि. ०३ जानेवारी, २०२६ (शनिवार) |
| ९ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि. १५ जानेवारी, २०२६ (गुरुवार) (सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत) |
| १० | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | दि. १६ जानेवारी, २०२६ (शुक्रवार) (सकाळी १०.०० वाजल्यापासून) |
| ११ | शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | दि. १९ जानेवारी, २०२६ (सोमवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

१९.१२.२०२५

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## परिशिष्ट - ३

## बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम - २०२५-२६

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.८०/का.५, दि. १५/१२/२०२५ सोबतचे सहपत्र)

| अ.क्र | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु अथवा पूर्ण करण्याचा दिनांक |
|---|---|---|
| | मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक | दि. ०१ जुलै, २०२५ (मंगळवार) |
| १ | आयुक्त, महानगरपालिका यांनी निवडणूक कार्यक्रमाची सूचना शासन राजपत्र व किमान दोन स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याची तारीख | दि. १६ डिसेंबर, २०२५ (मंगळवार) |
| २ | नामनिर्देशनपत्र देण्याचा कालावधी | दि. २३ डिसेंबर, २०२५ (मंगळवार) ते दि. २९ डिसेंबर, २०२५ (सोमवार) (कार्यालयीन वेळेत)<br>दि. ३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार) (दुपारी ४.०० वाजेपर्यंत)<br>(गुरुवार दि.२५ डिसेंबर, २०२५ व रविवार दि.२८ डिसेंबर, २०२५ रोजी नामनिर्देशनपत्रे देण्यात येणार नाहीत) |
| ३ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | दि. २३ डिसेंबर, २०२५ (मंगळवार) ते दि. ३० डिसेंबर, २०२५ (मंगळवार)<br>(दररोज सकाळी ११ ते दुपारी ५ पर्यंत)<br>(गुरुवार दि.२५ डिसेंबर, २०२५ व रविवार दि.२८ डिसेंबर, २०२५ रोजी नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यात येणार नाहीत) |
| ४ | नामनिर्देशनपत्रांची छाननी | दि. ३१ डिसेंबर, २०२५ (बुधवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ५ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |
| ६ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | दि. ०२ जानेवारी, २०२६ (शुक्रवार) पर्यंत (सकाळी ११ ते दुपारी ३) |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | दि. ०३ जानेवारी, २०२६ (शनिवार) (सकाळी ११.०० वाजल्यापासून) |
| ८ | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दि. ०३ जानेवारी, २०२६ (शनिवार) |
| ९ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | दि. १५ जानेवारी, २०२६ (गुरुवार) (सकाळी ७.३० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत) |
| १० | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | दि. १६ जानेवारी, २०२६ (शुक्रवार) (सकाळी १०.०० वाजल्यापासून) |
| ११ | शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | दि. १९ जानेवारी, २०२६ (सोमवार) पर्यंत |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

१५.१२.२०२५

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र